# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१४
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा - (पुढे सुरु).**

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : राज्यपालांच्या अभिभाषणावर मंत्र्यांचे उत्तर.**

**तीन : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री हनुमंत डोळस**, विजय वडेट्टीवार, शंभुराज देसाई, गणपत गायकवाड, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाचे पीक घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असतांना ऊसाला योग्य दर मिळत नसल्याने दर वाढवून मिळावा यासाठी ऊस परिषदेने ऊस उत्पादकांना २७०० रु. प्रति क्विंटल हमीभाव देण्याची शासनाकडे वारंवार केलेली मागणी, याकरिता शेतकरी संघटनांनी दि. २१ नोव्हेंबर, २०१४ पासून राज्यभर सुरू केलेली आंदोलने, यापूर्वीही झालेल्या आंदोलनामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर व पश्चिम महाराष्ट्रात मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, ऊसाला योग्य भाव देण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याची लोकप्रतिनिधी, शेतकरी संघटनांनी मा. मुख्यमंत्री, सहकारमंत्री यांचेकडे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी व त्यासुमारास मागणी केलेली असतांनाही आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील हजारों शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, ऊसाला दर वाढवून मिळावा यासाठी राज्यात नेहमीच आंदोलने होत असल्याने वीज बिलांवर निर्णय घेणाऱ्या वीज नियामक आयोगाच्या धर्तीवर एखादी सक्षम यंत्रणा कायमस्वरूपी कार्यान्वित करण्याची नितांत आवश्यकता, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून साखर कारखानदार व प्रशासनामधील एकवाक्यतेच्या अभावामूळे

सर्वसामान्य नागरीकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागणार असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न प्रत्येक वर्षी गंभीर होत असल्याने सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन त्वरीत कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **डॉ. सुधाकर भालेराव,** डॉ.मिलिंद माने, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नोंदणीकृत महिला बचत गटांचे नाव आणि कागदपत्रे वापरून पुरवठा ठेकेदार महिलांची फसवणूक करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास येणे, महिला बचत गटांच्या नावाखाली पोषण आहाराची कंत्राटे दिली जाऊ नयेत अशी अट असताना कमी निविदा आलेल्या संस्थांना ५ पेक्षा अधिक अंगणवाड्या मिळण्याचा मार्ग मोकळा करून घेण्यासाठी पुण्यातील महिला व बालकल्याण विभागीय आयुक्तालयाकडून सुरू असलेले प्रयत्न, अंगणवाडीमार्फत चालवल्या जाणाऱ्या "टेक होम रेशन" (टीएचआर) या अन्न पुरवठा करणाऱ्या योजनेवर महिला संस्थाऐवजी ठेकेदारांचा असलेला कब्जा, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **श्री.वैभव नाईक, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सिंधूदुर्ग जिल्ह्यातील शालेय आरोग्य तपासणीमध्ये ९९ शाळकरी विद्यार्थी दुर्धर आजाराने पीडित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस येणे, सदर शालेय आरोग्य तपासणीत ६ वर्षापर्यंतच्या आजारी बालकांचा आढावा घेण्यात आला असता यात सावंतवाडीत २१, देवगडमध्ये ८, कणकवलीत ५, मालवणमध्ये १५, दोडामार्ग येथे ९, वैभववाडीत २, कुडाळमध्ये २६, वेंगुर्ल्यात १३ अशी एकूण ९९ बालके किडनी, हृदयरोग, मतिमंद आदी आजाराने त्रस्त असल्याचे आढळून येणे, उक्त आजारी रुग्णांवर सीपीआर, कोल्हापूर व मुंबई येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).**

(१) महसूल व वन विभाग.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सहा : शासकीय विधेयके :-**

**(अ) महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १६१ अन्वये मुख्यमंत्री यांचा ठराव :-**

"संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्याप्रमाणे संविधान (एकशे एकविसावी सुधारणा) विधेयक, २०१४ द्वारे प्रस्तावित करण्यात यावयाच्या भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३६८ च्या खंड (२) मधील परंतुकाच्या खंड (ख) च्या कक्षेत येणाऱ्या सुधारणांचे हे सभागृह अनुसमर्थन करीत आहे."

**Resolution by the Chief Minister under Rule 161 of the Maharashtra Legislative Assembly Rules :-**

"That this House ratifies the amendments to the Constitution of India falling within the purview of clause (*b*) of the proviso to clause (*2*) of article 368, proposed to be made by the Constitution (One Hundred and Twenty First Amendment) Bill, 2014 as passed by both the Houses of Parliament."

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१४.

(२) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १२ डिसेंबर, २०१४

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.